# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA-2.96)

## व्यवस्थापन परिषदेच्या २०२ व्या (तातडीच्या) ऑनलाईन बैठकीचा कार्यवृत्तांत

## शुक्रवार, दि.०८ ऑगस्ट, २०२५ रोजी सकाळी ११: ३० वा.

प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची २०२ वी (तातडीची) **ऑनलाईन बैठक शुक्रवार, दि.०८ ऑगस्ट, २०२५ रोजी सकाळी ११:३० वा.** मा. कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली Google Meet Application द्वारे व्हिडीओ कॉन्फरन्सने आयोजित करण्यात आली आहे.

Google Meet Application द्वारे व्हिडीओ कॉन्फरन्सने बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) प्रकाश अण्णा महानवर, मा. कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| ४) | डॉ. प्रशांत मारुती पवार | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे | सदस्य | उपस्थित |
| ६) | प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे | सदस्य | उपस्थित |
| ७) | प्राचार्य डॉ. धिरजकुमार रंगनाथ बाड | सदस्य | अनुपस्थित |
| ८) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | अनुपस्थित |
| ९) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| १०) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | उपस्थित |
| ११) | श्री. महादेव धरेप्पा कमळे | सदस्य | अनुपस्थित |
| १२) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १३) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १४) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | अनुपस्थित |
| १५) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | अनुपस्थित |
| १६) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | उपस्थित |
| १७) | डॉ. उमेश काकडे<br>विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर<br>(मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | सदस्य | उपस्थित |
| १८) | डॉ. विनोद मोहितकर, मा. संचालक (तंत्रशिक्षण)<br>तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १९) | सीए महादेव सोमशंकर खराडे<br>वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |
| २०) | डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे<br>संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २१) | डॉ. अतुल तानाजी लकडे, प्र. कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

**स्वागत:**

प्र. कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले.

**भावपूर्ण श्रध्दांजली:**

व्यवस्थापन परिषदेचे अध्यक्ष तथा प्रस्तुत विद्यापीठाचे मा. कुलगुरु प्रा. (डॉ) प्रकाश महानवर यांची ज्येष्ठ बहिण कै. पार्वती विठ्ठल माने यांचे दि.०१/०८/२०२५ रोजी आकस्मित दुख:द निधन झाल्याने व प्रस्तुत विद्यापीठाचे सेवानिवृत्त कर्मचारी कै. दिगंबर तायाप्पा हराळे यांचे दि.०७/०८/२०२५ रोजी आकस्मित दुख:द निधन झाल्याने त्यांना व्यवस्थापन परिषदेच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली वाहण्यात आली.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १ ] | **प्रस्तुत विद्यापीठात कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ व सुरक्षा अधिकारी, सुरक्षा रक्षक पुरवठा करण्याकरिता मे. रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲण्ड सिस्टीम लिमिटेड या फर्म सोबत केलेला करार दि.११/०८/२०२५ रोजी संपुष्टात येत आहे. त्याअनुषंगाने सदर फर्मला तीन महिन्याची मुदतवाढ देऊन नवीन ई-टेंडरची प्रक्रिया राबवावी किंवा पुनश्च अकरा महिन्याकरिता याच फर्मला पुरवठा आदेश देण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठात कंत्राटी पध्दतीने मुनष्यबळ व सुरक्षा अधिकारी, सुरक्षा रक्षक पुरवठा करण्याकरिता मे. रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲण्ड सिस्टीम लिमिटेड यांच्या दि.१२/०९/२०२४ ते दि.११/०८/२०२५ या अकरा महिन्याच्या कालावधीसाठी विद्यापीठास कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ (एकत्रित वेतन, कुशल, अर्धकुशल व अकुशल) व सुरक्षा अधिकारी, सुरक्षा रक्षक पुरवठा करण्याबाबत पुरवठा आदेश व त्यानुसार करार करण्यात आला आहे. सदर फर्मसोबत केलेला करार हा ११/०८/२०२५ रोजी संपुष्टात येणार आहे. त्याअनुषंगाने उक्त फर्मने दि.१२/०८/२०२५ ते ११/०७/२०२६ या ११ महिन्यासाठी मुदत वाढवून मिळणेबाबत विनंती केली आहे.<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठात कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ व सुरक्षा अधिकारी, सुरक्षा रक्षक पुरवठा करण्याकरिता मे. रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲण्ड सिस्टीम लिमिटेड या फर्म सोबत केलेला करार दि.११/०८/२०२५ रोजी संपुष्टात येत आहे. त्याअनुषंगाने सदर फर्मला तीन महिन्याची मुदतवाढ देऊन नवीन ई-टेंडरची प्रक्रिया राबवावी किंवा पुनश्च अकरा महिन्याकरिता याच फर्मला पुरवठा आदेश देण्याची बाब विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठात कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ व सुरक्षा अधिकारी, सुरक्षा रक्षक पुरवठा करण्याकरिता मे. रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲण्ड सिस्टीम लिमिटेड या फर्म सोबत केलेला करार दि.११/०८/२०२५ रोजी संपुष्टात येत आहे. त्याअनुषंगाने सदर फर्मला तीन महिन्याची मुदतवाढ देण्यास व सदर कालावधीत नवीन ई-टेंडरची प्रक्रिया पूर्ण करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**<br>**तसेच मे. रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲण्ड सिस्टीम लिमिटेड या फर्मद्वारे कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत खंड देण्यासंदर्भात चर्चा करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात आली.** | |

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा | अध्यक्ष |
| २. | प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे | सदस्य |
| ३. | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य |
| ४. | सीए महादेव सोमशंकर खराडे | सदस्य |
| ५. | डॉ. अतुल तानाजी लकडे | सदस्य-सचिव |

मा. कुलगुरु तथा अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय:

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ २(१) ] | **शैक्षणिक वर्ष २०२६-२७ चा अल्पकालीन वार्षिक आराखडा शासनाच्या दि.०६/०८/२०२५ रोजीच्या पत्रानुसार अधिष्ठाता मंडाळाने केलेली शिफारस विचारार्थ.**<br>टिपणी: दिनांक ०६/०८/२०२५ रोजीच्या शासन पत्रानुसार महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १०७ (५) नुसार विद्यापीठ उच्च शिक्षणाची महाविद्यालये व परिसंस्था यांच्या ठिकाणासाठी सम्यक योजनेशी अनुरुप अशी वार्षिक योजना दरवर्षी तयार करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम सुरु करिल आणि तो कालबध्द कार्यक्रम ज्या वर्षात उच्च शिक्षणाचे नवीन महाविद्यालय व परिसंस्था सुरु करायचे असतील त्या अधीचे शैक्षणिक वर्ष संपण्यापूर्वी प्रसिध्द करील अशी तरतूद आहे. त्यानुषंगाने प्रस्तुत विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०२६-२७ या एका वर्षाची (अल्पकालीन) वार्षिक आराखडा तयार करण्यात आला आहे. सदरचा वार्षिक आराखडा दि. १४/०८/२०२५ पर्यंत शासनास सादर करणेबाबत आदेश प्राप्त झालेले आहेत.<br>तसेच विद्यापीठ कार्यक्षेत्रातील वेगवेगळ्या संस्थेचे संस्थाचालक/प्राचार्य/ शिक्षणप्रेमी/नागरिक यांच्याकडून विविध निवेदने / पत्रे प्राप्त झाली असून, त्यानुसार त्या प्रस्तावांची दि. ०८/०८/२०२५ रोजी छाननी समिती नियुक्त करुन सदर प्राप्त निवेदनांची छाननी करण्यात आली. उपरोक्त छाननी समितीचा अहवाल महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०७(१) मधील तरतूदीनुसार अधिष्ठाता मंडळाकडून बृहत आराखडा तयार करणेकामी तातडीची बाब असल्याने मा. अधिष्ठाता मंडळाच्या वतीने मान्यता घेवून सदरचा विषय व्यवस्थापन परिषदेसाठी विचारार्थ सादर करण्यास शिफारस करण्यात आली.<br>सबब, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ चा अल्पकालीन वार्षिक आराखडा शासनाच्या दिनांक ०६/०८/२०२५ रोजीच्या पत्रानुसार अधिष्ठाता मंडाळाने केलेली शिफारस विचारार्थ. | संलग्नता विभाग |
| ठराव: | **शैक्षणिक वर्ष २०२६-२७ चा अल्पकालीन वार्षिक आराखडा शासनाच्या दि.०६/०८/२०२५ रोजीच्या पत्रानुसार अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते विद्यापरिषदेस शिफारस करण्यात आली.** | |

मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे प्र.कुलसचिव यांनी जाहीर केले.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद